**प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा, अंगारा ता.कुरखेडा, कोटगुल ता.कोरची, मसेली ता. कोरची, पोटेंगाव ता. गडचिरोली जि.गडचिरोली येथील दुरुस्ती व नवीन बांधकामाच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन,**
**आदिवासी विकास विभाग,**
**शासन निर्णय क्र. शाआदु-२००९/प्र.क्र.३३४/का.१३**
**मंत्रालय विस्तार, मुंबई**
**दि :- ३० डिसेंबर २००९**

**शासन निर्णय** : कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, आलापल्ली, यांनी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांच्या कार्यक्षेत्रातील शासकीय आश्रमशाळा, अंगारा ता.कुरखेडा, कोटगुल ता.कोरची, मसेली ता. कोरची, पोटेंगाव ता. गडचिरोली जि. गडचिरोली येथील दुरुस्तीच्या कामांची एकूण रु. ३९,०२,७८९/- (रु. एकोणचाळीस लाख दोन हजार सातशे एकोणनव्वद फक्त) इतक्या रकमेची ४ अंदाजपत्रके व आराखडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविलेली आहेत.

२. सदर अंदाजपत्रके संबंधित शाखा अभियंता यांनी तयार केली आहेत व उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, कुरखेडा, गडचिरोली यांनी तपासली आहेत. तसेच उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, कोरची, क्र.१ गडचिरोली व कुरखेडा आणि कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गडचिरोली यांनी सांक्षांकित केली आहे.

३. उपरोक्त शासकीय आश्रमशाळेची अंदाजपत्रके सन २००९-१० च्या दरसूचीवर आधारित आहेत. सदर कामे ही दुरुस्तीची असून प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी यांच्या कार्यक्षेत्रातील उपरोक्त शाळेच्या एकूण रु. ३९,०२,७८९/- (रु. एकोणचाळीस लाख दोन हजार सातशे एकोणनव्वद फक्त) इतक्या रकमेस खालीलप्रमाणे प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

| अ. क्र. | शासकीय आश्रमशाळेचे नांव | कामांचा तपशील | अंदाजपत्रकीय रक्कम रुपये. |
|---|---|---|---|
| १ | शासकीय आश्रमशाळा, अंगारा ता.कुरखेडा जि. गडचिरोली | वर्ग खोल्या व स्नानगृहांची दुरुस्ती. | ६,००,०००/- |
| २ | शासकीय आश्रमशाळा, कोटगुल ता.कोरची, जि. गडचिरोली | दरवाजे/ खिडकी दुरुस्ती, फरशी बसविणे व किरकोळ दुरुस्ती करणे. | ८,००,०००/- |

| | | | |
|---|---|---|---|
| ३ | शासकीय आश्रमशाळा, मसेली ता. कोरची, जि. गडचिरोली | छप्पर दुरुस्ती, फरशी बसविणे , पाणी पुरवठयाची व्यवस्था करणे | ६,५२,७८९/- |
| ४ | शासकीय आश्रमशाळा, पोटेंगाव ता. गडचिरोली जि. गडचिरोली | स्नानगृहांची/ शौचालयाची दुरुस्ती, फरशी बसविणे , दरवाजे/ खिडकी दुरुस्ती, पाण्याची टाकी बसविणे. | १८,५०,०००/- |
| | | एकूण | ३९,०२,७८९/- |

४. सदर काम सुरु होण्यापूर्वी व झाल्यानंतर त्याचे व्हिडीओ शुटींग करण्यात यावे.

५. सदर दुरस्तीचा खर्च सन २००९-१० साठी मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्र. विपअ-१००१/ प्र.क्र.४६/२००१ विनियम, दिनांक ११ जलै, २००१ मधील भाग- पहिला, उपविभाग- पाच अनुक्रमांक-१ नियम १३४ अनुसार प्रशासकीय विभागास प्रदान केलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२०१००१०२१३५५४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( गी. मो. चांदे )
अवर सचिव

प्रति,

आयुक्त, आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य नाशिक
अपर आयुक्त, आदिवासी विकास, नागपूर
प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी
महालेखापाल (लेखा परिक्षा), (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१, मुंबई
महालेखापाल (लेखा परिक्षा), (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-२, नागपूर
जिल्हा कोषागार अधिकारी, गडचिरोली
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.१, गडचिरोली
उपविभागीय अभियंता, सा.बां. उपविभाग, क्र.१, गडचिरोली कुरखेडा, कोरची
कक्ष अधिकारी (का.७), आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती का-१३, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.